॥ ज्योतिर्मय ॥
Online Journal of Literature....
साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २६५ वा ❑ गुरूवार दि.१८ डिसेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

## अल्पसंख्याक हक्क दिन का साजरा केला जातो?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

दरवर्षी १८ डिसेंबर रोजी अल्पसंख्याक हक्क दिन साजरा केला जातो. या दिवशी देशातील अल्पसंख्याक समुदायांसमोरील आव्हाने आणि समस्यांकडे लक्ष वेधले जाते. लोक धार्मिक, सांस्कृतिक, भाषिक आणि वांशिक अल्पसंख्याकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी वकिली करतात.

अल्पसंख्याक म्हणजे भारतात राहणारे असे समुदाय जे संख्येने कमी आहेत आणि सामाजिक, राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेले आहेत. जरी हे खरे आहे की अल्पसंख्याक समुदायाचे सदस्य, वंश, भाषा, धर्म किंवा परंपरेने, बहुसंख्याकांपेक्षा वेगळे आहेत, तरी ते राष्ट्र उभारणी, एकता आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन करण्यात महत्त्वपूर्ण योगदान देतात. भारतातील काही समुदायांना अल्पसंख्याक म्हणून ओळखले गेले आहे, ज्यात मुस्लिम, बौद्ध, शीख, ख्रिश्चन, पारशी आणि जैन यांचा समावेश आहे.

देशातील धार्मिक अल्पसंख्याकांच्या संवैधानिक हक्कांचे रक्षण करण्यासाठी दरवर्षी १८ डिसेंबर रोजी भारतात अल्पसंख्याक हक्क दिन साजरा केला जातो. अल्पसंख्याक हा शब्द अल्प आणि सांख्यक या दोन शब्दांपासून आला आहे, ज्याचा अर्थ इतरांच्या तुलनेत अल्पसंख्याक असा होतो. भारतातील अल्पसंख्याकांमध्ये मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, जैन आणि पारशी यांचा समावेश आहे.

अल्पसंख्याक हक्क दिन हा राष्ट्रीय किंवा वांशिक, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांच्या व्यक्तींच्या हक्कांवरील घोषणेचे स्मरण करतो. या दिवशी, सरकारे त्यांच्या भेदभावाशिवाय आणि समानतेच्या हक्कांची हमी देण्यासाठी प्रयत्न करतात.

या दिवशी, देशातील अल्पसंख्याक समुदायांसमोरील आव्हाने आणि समस्यांकडे लक्ष वेधले जाते. लोक धार्मिक, सांस्कृतिक, भाषिक आणि वांशिक अल्पसंख्याकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी वकिली करतात. अल्पसंख्याकांविरुद्ध सर्व प्रकारचे भेदभाव दूर करण्याच्या उद्देशाने हा दिवस साजरा केला जातो. भारतीय संविधानात अल्पसंख्याकांची स्पष्ट कायदेशीर व्याख्या नसली तरी, संविधानातील अनेक तरतुदी, जसे की कलम २९ आणि ३०, अल्पसंख्याकांच्या हिताचे रक्षण करतात.

**अल्पसंख्याक हक्क दिनाचा इतिहास**

१९९२ मध्ये, संयुक्त राष्ट्रांनी १८ डिसेंबर हा दिवस अल्पसंख्याक हक्क दिन म्हणून घोषित केला. धार्मिक, भाषिक, राष्ट्रीय किंवा वांशिक अल्पसंख्याकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी हा दिवस स्वीकारला. राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग हा दिवस आयोजित करण्याची जबाबदारी घेते. केंद्र सरकारने १९९२ मध्ये राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग कायद्याअंतर्गत अल्प संख्यांक आयोगाची स्थापना केली.

**भारतातील १९ टक्के अल्पसंख्याक**

भारतात भाषा आणि धर्म हा अल्पसंख्याक दर्जाचा आधार मानला जातो. विशिष्ट क्षेत्रात त्यांच्या जात, धर्म, संस्कृती, भाषा आणि परंपरांचे संरक्षण सुनिश्चित करणे हे प्राथमिक उद्दिष्ट आहे. तथापि, संविधान भाषा आणि धर्माला अल्पसंख्याक म्हणून मान्यता देते. अल्पसंख्याक समुदाय हे भारताच्या एकूण लोकसंख्येच्या फक्त १९ टक्के आहेत. भारतीय संविधानाच्या कलम १५ आणि १६ च्या मूलभूत हक्कांमध्ये (मूलभूत हक्क) अल्पसंख्याकांचे हक्क समाविष्ट आहेत. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांना विशेष अधिकार मिळाले पाहिजेत आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण मिळाले पाहिजे. संविधानात यासाठी तरतूद आहे.

**अल्पसंख्याकांसाठी स्वतंत्र मंत्रालय**

भारतातील अल्पसंख्याक मंत्रालय लोकांना त्यांच्या हक्कांबद्दल शिक्षित करते, ज्यामध्ये संरक्षण, सुरक्षा, शिक्षणाचा अधिकार, संवैधानिक अधिकार, आर्थिक सक्षमीकरण, महिला सक्षमीकरण, समान संधी आणि कायद्याअंतर्गत संरक्षण यांचा समावेश आहे. भारतातील अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालय अल्पसंख्याकांशी संबंधित मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करते.

**भारतातील अल्पसंख्याकांना हे अधिकार आहेत**

भारतीय संविधान अनुच्छेद २९ आणि ३० अंतर्गत धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांना विशेष अधिकार प्रदान करते. अनुच्छेद २९(१) नुसार, भारतातील कोणत्याही राज्यात किंवा स्वतःची प्रादेशिक भाषा, लिपी किंवा संस्कृती असलेल्या कोणत्याही प्रदेशात राहणाऱ्या कोणत्याही समुदायाच्या लोकांना तो प्रदेश जपण्याचा अधिकार आहे. ही तरतूद लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५१ अंतर्गत आहे. अनुच्छेद ३०(१) नुसार, सर्व अल्पसंख्याकांना धर्म किंवा भाषेची पर्वा न करता त्यांच्या आवडीच्या शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा अधिकार आहे. अल्पसंख्याकांना शिक्षणाचा अधिकार आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण, १९८६, समानता आणि सामाजिक न्यायाच्या हितासाठी शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या अल्पसंख्याकांच्या शिक्षणावर विशेष भर देते. १९९२ मध्ये, दोन नवीन योजना जोडण्यात आल्या: शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या अल्पसंख्याकांसाठी सघन प्रादेशिक कार्यक्रम आणि १९९३-९४ दरम्यान सुरू करण्यात आलेली मदरसा शिक्षण आधुनिकीकरण आर्थिक सहाय्य योजना. राष्ट्रीय अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था आयोगाची स्थापना २००४ मध्ये करण्यात आली, ज्या अंतर्गत अल्पसंख्याक संस्था अनुसूचित शाळांशी स्वतःला संलग्न करू शकतात. सध्या, दिल्ली विद्यापीठ, ईशान्य हिल विद्यापीठ, आसाम विद्यापीठ, नागालँड विद्यापीठ आणि मिझोरम विद्यापीठ या यादीत समाविष्ट आहेत. शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या अल्पसंख्याकांसाठी क्षेत्र गहन कार्यक्रम हा या कार्यक्रमाचा प्राथमिक उद्देश आहे. या कार्यक्रमाचा प्राथमिक उद्देश शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या अल्पसंख्याक मोठ्या संख्येने राहत असलेल्या भागात शैक्षणिक सुविधा प्रदान करणे आहे. मदरसा शिक्षणाचे आधुनिकीकरण करण्यासाठी आर्थिक सहाय्य दिले जाते. शिवाय, पर्शियन आणि अरबी भाषांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांना देखील आर्थिक सहाय्य दिले जाते.

## सीपीआर चे ज्ञान सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवणे महत्वाचे-डॉ.अनुपम टाकळकर

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : इंडियन मेडिकल असोसिएशन छत्रपती संभाजीनगर शाखेतर्फे सीएसएमएसएस डेंटल कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी सीपीआर जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आपत्कालीन परिस्थितीत त्वरित मदत करून मानवी जीवन सुरक्षित करता यावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.



या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सीएसएमएस चे डॉ. श्रीकांत देशमुख उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की अचानक उद्भवणाऱ्या आपत्कालीन प्रसंगी सीपीआर सारखे जीवनरक्षक कौशल्य प्रत्येकाला माहित असणे अत्यंत आवश्यक आहे. वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी समाजासाठी तत्पर राहण्याची मानसिकता विकसित करावी, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षपद इंडियन मेडिकल असोसिएशन छ. संभाजीनगर शाखेचे अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर यांनी भूषविले. अध्यक्षीय भाषणात त्यांनी सांगितले की भारतात हृदयविकारामुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी मोठा टक्का हा रुग्णालयाबाहेर होतो. हृदय बंद पडल्यानंतरची पहिली ४ ते ६ मिनिटे अत्यंत निर्णायक असतात. या काळात सीपीआर दिली गेली तर मृत्यूचा धोका मोठ्या प्रमाणावर कमी करता येतो. सीपीआर चे ज्ञान सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवणे हे आयएमए चे सामाजिक दायित्व आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

विशेष अतिथी म्हणून सीएसएमएस डेंटल कॉलेजच्या अधिष्ठाता डॉ. लता काळे उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना वैद्यकीय अभ्यासाबरोबरच सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवण्याचे आवाहन केले आणि अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो, असे नमूद केले. आयएमएच्या या उपक्रमाचे त्यांनी विशेष कौतुक केले.

या कार्यक्रमाचे समन्वयन डॉ. आसावरी टाकळकर यांनी केले. फिजिशियन डॉ. प्रशांत वळसे यांनी रस्त्यावर अचानक व्यक्ती बेशुद्ध पडणे, फिट येणे, श्वास न घेणे अशा आपत्कालीन प्रसंगी प्रथम काय करावे, कसा योग्य प्रतिसाद द्यावा, याचे सविस्तर मार्गदर्शन केले. योग्य वेळी घेतलेला निर्णय अनेकदा प्राण वाचवतो, हे त्यांनी प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट केले.

समितीच्या अध्यक्ष डॉ. कुंदा धुळे यांनी सीपीआर प्रशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की प्रत्येक वैद्यकीय विद्यार्थी हा भविष्यातील प्रथम प्रतिसादकर्ता असतो. अशा प्रशिक्षणामुळे आपत्कालीन प्रसंगी योग्य आणि तात्काळ मदत देता येते. आयएमए मार्फत राबविण्यात येणारे हे उपक्रम समाजासाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे त्यांनी नमूद केले.

समितीच्या संयोजक डॉ. प्रीती भाग्यवंत यांनी सीपीआर हे केवळ तांत्रिक कौशल्य नसून आत्मविश्वास आणि निर्णयक्षमता वाढवणारे प्रशिक्षण आहे, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी हे ज्ञान आत्मसात करून भविष्यात नक्कीच अनेक जीव वाचवावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

आयएमए छ. संभाजीनगर शाखेचे सचिव डॉ. योगेश लक्कस यांनी शाखेच्या विविध समाजोपयोगी उपक्रमांची माहिती दिली. सिपीआर जनजागृती कार्यक्रमांद्वारे शैक्षणिक संस्था आणि नागरिकांपर्यंत पोहोचण्याचा शाखेचा संकल्प त्यांनी स्पष्ट केला.

भूलतज्ज्ञ डॉ. कुंदा धुळे आणि डॉ. प्रीती भाग्यवंत यांनी सीपीआर चे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक अत्यंत सोप्या आणि व्यवहार्य पद्धतीने सादर केले. छातीवरील दाब देण्याची योग्य पद्धत, गती आणि हाताने दिली जाणारी सीपीआर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष करून दाखवण्यात आली.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी सीपीआर संदर्भात प्रश्न विचारून आपली शंका दूर केली. अनेक विद्यार्थ्यांनी अशा जीवनरक्षक प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन नियमितपणे व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. आयोजकांच्या वतीने सीएसएमएस डेंटल कॉलेजच्या व्यवस्थापनाचे सहकार्याबद्दल आभार मानण्यात आले.

या उपक्रमातून भविष्यात आपत्कालीन परिस्थितीत त्वरित आणि योग्य मदत करणारे सक्षम आणि संवेदनशील वैद्यकीय व्यावसायिक घडतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## राजकपूर : अजरामर महानायक

ज्योतिर्मय साहित्य

राजकपूर : अजरामर महानायक

(जन्म : १४ डिसेंबर १९२४ । निधन : २ जून १९८८)



१४ डिसेंबर २०२४ ते १४ डिसेंबर २०२५ हे वर्ष राजकपूर यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून संपूर्ण देशभर साजरे केले जात आहे. हिंदी चित्रपट सृष्टीतील अभिनय, दिग्दर्शन आणि निर्मिती या तिन्ही क्षेत्रांवर अमिट छाप उमटवणारे राजकपूर हे केवळ अभिनेता नव्हते, तर एक संवेदनशील कलाकार, विचारवंत आणि सामान्य माणसाचे प्रतिनिधी होते.

बालपण व कुटुंब

राजकपूर यांचा जन्म पेशावर (आताचे पाकिस्तान) येथे झाला. त्यांचे वडील पृथ्वीराज कपूर हे स्वतः एक महान नट होते. कपूर कुटुंबाने भारतीय रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीला अतुलनीय योगदान दिले आहे. लहानपणापासूनच राजकपूर यांना अभिनयाची ओढ होती.

चित्रपटसृष्टीतील कारकीर्द

राजकपूर यांनी अतिशय लहान वयात चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. वयाच्या अवघ्या २४व्या वर्षी त्यांनी आर. के. फिल्म्स या निर्मिती संस्थेची स्थापना केली.

त्यांच्या काही अजरामर चित्रपटांमध्ये – आवारा, श्री ४२०, बरसात, जागते रहो, अनाड़ी, मेरा नाम जोकर, संगम या चित्रपटांमधून त्यांनी गरिबी, अन्याय, प्रेम, समाजातील विषमता आणि मानवी भावना अतिशय प्रभावीपणे मांडल्या.



सौ सुरेखा राजेंद्र शेजवळ
मा.उपशिक्षिका कन्या शाळा,
सातारा. फोन :9822749758

‘आवारा’ प्रतिमा सामान्य माणसाचा नायक

राजकपूर यांची टोपी, काळा कोट, पांढरी पँट आणि हातात काठी ही ‘आवारा’ प्रतिमा आजही अजरामर आहे. चार्ली चॅप्लिनप्रमाणे त्यांनी सामान्य माणसाचे दुःख, संघर्ष आणि आशा पडद्यावर जिवंत केली.

त्यांचे संवाद, अभिनयातील सहजता आणि डोळ्यांतून व्यक्त होणाऱ्या भावना प्रेक्षकांच्या मनात घर करून गेल्या.

संगीत व काव्य

राजकपूर यांच्या चित्रपटांतील गाणी आजही तितकीच लोकप्रिय आहेत.

‘‘आवारा हूँ’’, ‘‘मेरा जूता है जापानी’’ ही गाणी केवळ मनोरंजन नाही, तर सामाजिक भाष्य होती.

शंकरजयकिशन यांचे संगीत आणि शैलेंद्रहसरत जयपुरी यांचे शब्द यांमुळे त्यांच्या चित्रपटांना वेगळी उंची मिळाली.

आंतरराष्ट्रीय लोकप्रियता

राजकपूर हे भारताबाहेरही अतिशय लोकप्रिय होते. विशेषतः रशिया, चीन, मध्य आशिया येथे त्यांना अफाट प्रेम मिळाले. ‘आवारा’ चित्रपटाने जागतिक पातळीवर भारतीय चित्रपटसृष्टीचा मान उंचावला.

सन्मान व पुरस्कार

पद्मभूषण दादासाहेब फाळके पुरस्कार

हे पुरस्कार त्यांच्या अमूल्य योगदानाची पावती आहे.

आठवणी आणि वारसा

राजकपूर यांचे आयुष्य संघर्ष, सर्जनशीलता आणि संवेदनशीलतेचे प्रतीक होते. मेरा नाम जोकर हा चित्रपट त्यांच्या आयुष्याशी जोडलेला असून ‘‘कलाकाराचे दुःख पडद्यामागे लपलेले असते’’ ही भावना त्यांनी त्यातून मांडली.

आजही त्यांच्या चित्रपटांतून माणुसकी, प्रेम, करुणा आणि सामाजिक जाणीव शिकायला मिळते.

त्यांचे पुत्र रणधीर कपूर, ऋषी कपूर आणि पुढील पिढीनेही हा वारसा पुढे नेला.

निष्कर्ष

राजकपूर हे मनाने कवी, आत्म्याने कलाकार आणि कृतीने समाजभान असलेले नायक होते. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांना अभिवादन करताना एवढेच म्हणावेसे वाटते

‘‘राजकपूर गेले, पण ‘आवारा’ आजही आपल्या मनात जिवंत आहे.’’

अशा महान व्यक्तीला १४ डिसेंबर त्यांच्या जन्मदिनी त्यांना शतशः नमस्कार

***

## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख-११९



"वास्तुशास्त्र पेंटींग" या लघुलेख मालेच्या निमित्ताने मला अनेक जिज्ञासु वाचकांनी मोबाईल व्दारे संपर्क केले, मेसेजेस पाठवले. त्या साऱ्यांनाच त्यांच्या चौकस-जिज्ञासु वैचारिकतेला वंदन करून, त्यांच्या उत्साहाला दाद देतो. त्यांचे आभार मानतांनाच एक बाब ध्यानात आली ती म्हणजे आपला हा सुरु असलेला स्तंभ, उत्तरार्धाच्या शेवटच्या टप्प्यावर असतांना, खूप जणांच्या इच्छा, शंका, प्रश्न आणि "भवितव्या विषयीचा पर्यायी मार्ग" या विचाराने, या विषयांकडील ओढा ध्यानी आला कारण आता सध्या या साऱ्यांच्या संवादाला प्रतिसाद देण्याचं काम सुरु आहे.

काहींनी फार आग्रहाने मागणी केली की २७ नक्षत्रांच्या आराध्य देवतांची नांवे, त्यांचं वर्णन, त्यांचे प्रतिकात्मक रूप यां सह माहिती या जिज्ञासूंना हवी आहे.अशी माहिती जरी उपलब्ध असली तरी या लेखमालेचा तो विषय नसल्याने मूळ विषयाला वेगळे वळण लागु नये याची काळजी घेतली पाहिजे तथापि आपण तीती नक्षत्रे आणि त्यांच्या देवतांची नांवे एवढीच माहिती आणि त्या देवते बद्दलचे विशेष महत्व जाणून घेण्याचा प्रयत्न करुया..!

अश्विनी नक्षत्राची देवता"अश्विनी कुमार" आहेत ज्यांचं वर्णन म्हणजे,हे जुळे भाऊ असून ते देवांचे वैद्य आहेत. "नासत्य" आणि "दस्त्र" ही या जुळ्या भावांची नांवे आहेत. यांच्या वडिलांचे नांव "विवस्वान" असून आई " सरण्यूं" आहे. हयां जुळ्या भावांचा मुख्य आहार म्हणने हे हे "मध" पितात. सूर्य कन्या "सूर्ये"चे तो पती आहेत.

"भरणी" नक्षत्राची देवता "यमराज" आहेत, ''यम "ही एक वैदीक देवता आहे. 'यमा' चे वडील "विवस्वान" व आई "संज्ञा" होय. "संज्ञे"चा पुत्र 'यम' हा मानवाच्या प्राणांचे हनन करणारा देव आहे. त्याच्या उजव्या दोन हातात दंड व खड्ग आणि डाव्या दोन हातात जळता त्रिशूळ व जपमाळ आहे. याची प्रार्थना केल्यास तो आपल्याला जिवंतपणीही सुखात ठेवतो.

पुढील लेखात आपण, पुढील नक्षत्र देवतांची थोडक्यात माहिती घेऊया.

क्रमश :

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238



# जात्यावरच्या ओव्या......

शेजीबाई तुझ बाळ
आल खेळत खेळत
बसल माझ्या कुशी
नाही वळख लागत ||४०१||

तुझी लेक माझी लेक
एकाच सालाच्या
जणू बहीणी जावळ्या
मायाळु माऊलीच्या ||४०२||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# रंगोली सजाओ रे...



## उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

रांगोळी आपल्यातल्या कलेला वाट करून देते. मनातल्या भावभावना जशा चित्राच्या माध्यमातून एखादा कुशल चित्रकार कागदावर मूर्त स्वरुपात व्यक्त करतो, तशाच भावभावना रांगोळीतून सुद्धा व्यक्त करता येतात. आधी चित्र मनात असते. मनातले चित्र मग रांगोळीच्या रूपाने साकार होते. मनातले रंग चित्रात उतरतात. आकर्षक रंगसंगतीने रांगोळी खुलून दिसते. चित्रकाराच्या कुंचल्याप्रमाणे रांगोळी काढणाऱ्या बोटांमधेही जादू असते. रांगोळीच्या आकर्षक आणि रेखीव रेषा चित्राला म्हणजेच रांगोळीला सजीवता प्रदान करतात. रांगोळी काढणारे कुशल हात जेव्हा एखाद्या व्यक्तीचे चित्र काढतात तेव्हा त्या रांगोळीच्या रेषा चेहऱ्यावरील आनंद, दुःख, आश्चर्य, शांतता इ. भाव सुद्धा व्यक्त करतात.



आता तर रांगोळीचे कितीतरी प्रकार आणि साधने आपल्याला उपलब्ध झाली आहेत. ज्यांना फारशी चांगली रांगोळी काढता येत नाही, किंवा रांगोळी घालायला वेळ नाही अशांसाठी रांगोळ्यांचे छापे उपलब्ध झाले आहेत. त्यात रांगोळी भरली की झाले ! रांगोळीचे पेन, रेडीमेड रांगोळीचे स्टिकर्स उपलब्ध आहेत. आपल्या नेहमीच्या रांगोळीसोबत संस्कार भारतीची रांगोळी, पाण्यावरील रांगोळी, पानाफुलांची रांगोळी असे रांगोळीचे कितीतरी प्रकार आहेत. रांगोळी काढलेले अंगण किती सुंदर दिसते ! देवघरापुढे काढलेली रांगोळी, एखाद्या मंगल कार्याच्या प्रसंगी काढलेली रांगोळी त्या कार्याला पावित्र्य आणि मांगल्याची जोड देते. रांगोळी म्हणजे जणू सौंदर्य आणि मांगल्य यांचा सुरेख संगम ! जेवणाची पंगत असेल तर पानाभोवती काढलेली रांगोळी आपले मन प्रसन्न करते. रांगोळी जणू त्या पंगतीला प्रेम, कौटुंबिक जिव्हाळा आणि पावित्र्य प्रदान करते.

कशासाठी काढतो आपण रांगोळी ? केवळ घर, अंगण सुशोभित करण्यासाठी ? ते तर आहेच पण आपल्यातील कला व्यक्त करण्याचे ते एक सुंदर माध्यम आहे. रांगोळीमध्ये एक प्रकारची सकारात्मक उर्जा असते. आपल्या अंगणात घातलेली सुंदर रांगोळी घराला सकारात्मक उर्जा प्रदान करते. नकारात्मक गोष्टींपासून दूर ठेवते. खरोखर रांगोळी हे भारतीय संस्कृतीचे एक खास वैशिष्ट्य आहे ! आजकाल रांगोळी काढण्यासाठी घरापुढील अंगणाचा संकोच झाला असला तरी भारतीय स्त्री असेल त्या उपलब्ध जागेत रांगोळी काढते. घराला पावित्र्य आणि मांगल्य प्रदान करते. नकारात्मक गोष्टी, वाईट भावभावनांपासून घराला दूर ठेवते.

असे हे रांगोळीचे रंग आपले जीवनही आकर्षक करोत, त्यात आनंदाचे, सुखाचे रंग भरोत. आपले जीवन हे सुद्धा एका सुंदर आकर्षक रांगोळीप्रमाणे होवो की जे इतरांना आनंद देईल, सकारात्मक उर्जा प्रदान करील. **(क्रमशः)**



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# अनिर्वाच्यनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

संत आत्मबुध्दीच्या भुमिकेत असतात त्यांना आत्मसाक्षात्कार झालेला असतो संताच्या जवळ मी पणा नसतो. संताच्या जवळ सर्व दुजपण जाऊन फक्त अद्वैत शिल्लक रहाते. सर्व भाषा विषयक अभ्यासकांच्या माहिती साठी समर्थांचा मोलाचा सल्ला घ्यावा. तो पुढील प्रमाणे.

सर्व दुजेपण नाहींसे होऊन केवळ अद्वैत रहाते त्या स्थितीमध्ये अनुभव घेणे ही भाषा सुध्दा शिल्लक रहात नाही पण स्वस्वरूपाशी झालेली समरसता जेव्हा भाषेमध्ये सांगण्याचा प्रसंग येतो त्यावेळी खरी अडचण येते. ही अडचण निवारण्यासाठी माणसाची कल्पनाच उपयोगी पडते. हा कल्पनेचा प्रकार असल्याने खरा नसतो. पण त्याखेरीज गत्यंतर नसते. म्हणून संत आपली भाषा वापरतात तरी त्याचा अर्थस्वस्वरूपोन्मुख असतो. दासबोधाच्या अभ्यासकांनी ही गोष्ट कधीही विसरू नये.

मी अनुभव घेतला यामध्ये त्रीपुटी येते. ही द्वैतमय असते. द्वेत ही समजणारी स्थिती आहे. ती भाषेच्या कक्षेत येते. परंतु स्वस्वरूपाशी केवळ अद्वैत असल्याने तेथे द्वैत रहात नाही म्हणून भाषा पोहचू शकत नाही. स्वस्वरूप अनिर्वाच्य आहे ते शब्दांत सांगता येत नाही. सर्व शब्दांचे मुळ ओंकार आहे ओंकार लय पावला तर शब्द, बोलणें न बोलणें सर्व नाहींसें होईल. भावनेची आई माया आहे

मायेचे अस्तित्व मानून अध्यात्म सांगण्याची एक पध्दत आहे. तर माया मुळी नाहींचं असे मानुन स्वस्वरूपज्ञान सांगण्याची दुसरी पध्दत आहे. देहबुध्दीतील लोकांना विषय समजण्यास पहिली पध्दत उपयोगी पडते तर आत्मसुख झालेल्या साधकांना स्वतः च्या स्वस्वरूप कल्पना समजण्यासाठी दुसरी पध्दत उपयोगी आहे.

जय जय रघुवीर समर्थ

आतापर्यंत आपण मायेचे अस्तित्व जाणले. आता आपण ३७ व्या ओवीत समर्थ आपल्याला काय बोध देतात ते पाहूया. मूळ स्वयंप्रकाश आत्मस्वरूप स्वानंदात होते. यासाठी समर्थ झोप व स्वप्नाचें उदाहरण देतात. ते कसे पहा.

झोप लागली म्हणजे माणसाला स्वस्वरूपाचा विसर पडला. झोपेत स्वप्न पडले म्हणजे आपण देहरूप आहोत हा भास होऊन सर्वत्र भेदाने भरलेले विश्व दिसु लागते. मानवी मनाच्या व संसाराच्या काळज्या दुःख यामुळे त्याला भय वाटते. आताच्या झोपेच्या अवस्थेत व स्वप्नात तो भगवंताला शरण् जातो सद्गुरूला शरण् जातो. हा सगळा द्रुष्यातील आपल्या कल्पनेचा व्यवहार आहे. झोपेतला माणूस जागा झाला की त्याला झोपेत पाहिलेल्या गोष्टी व्यर्थ वाटू लागतात. देहबुद्धी मरून अज्ञान संपले की आहे आणि नाही हा मनाचा खेळ चालू होतो. आत्मस्वरूप आहे व नाही या मानवी मनाच्या कल्पनेच्या पलीकडे आहे. ते केवळ असते. शुध्द असणे हा त्याच स्वभाव आहे. त्यालाच सत्ता असे म्हणतात.

आहे आणि नाही यात सामावलेले सारे विश्व लय पावले संपले की शुन्य उरते. त्या शुन्याच्यापलीकडे शुध्द आत्मज्ञान असते. त्या ज्ञानाने समाधान होते. आपण स्वतः व आत्मा एकरूप आहोत या अभिन्नपणाच्या अनुभवाने सहजस्थिती प्राप्त होते. या अवस्थेत देहाचे सर्व व्यवहार होतात तरी स्वरूपाशी झालेले ऐक्य आहे तसेच रहाते म्हणून याला सहजस्थिती असे म्हणतात.

जय जय रघुवीर समर्थ।।

**(क्रमशः)**

# जेथे भगवंताचें नामस्मरण तेथे सर्व संतांचें ठाण



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

जोंवर धरिली जगाची आस । तोंवर परमात्मा दूर खास ।। परमात्म्याची प्राप्ति । न होई राखता विषयासक्ति ।। जग विषयाकार राहिले । तेथे प्रेम केले तरी घातासी आले ।। विषयी एकजीव झालो जाण । सुटता न सुटे आपण जाण ।। मान, अपमान, जगाचे सुख-दुःख । हे स्वार्थाचेच मूळ आहे जाण ।। अभिमानात परमात्म्याचे विस्मरण। हें जीवपणाचें मुख्य लक्षण।। सुख-दुःख, विपत्ति - आपत्ति,। ही माया प्रपंचाची ओहोटी भरती।। आत्मनिश्चय बाणल्यावांचून। माया न हटे न सुटे जाण।। आता करी शूर मन। मायेसी हटवावे आपण।। जैसें जैसें बाहेर दिसलें। त्याचें बीज आपणाशीच उरलें।। एकच वस्तूची ओळखण जाण । पूर्ण होते समाधान।। ज्याच्यांत मानावें मी सुख। त्याच्यातच उद्भवतें दुःख।। नराचा होय नारायण। जर न चुकला मार्ग जाण।। जेथे ठेवावी आस। त्याचे बनावें लागतें दास।। देह तो पंचभूतांचा। त्याचा भरवसा न मानावा फारसा।। मी तुम्हांस सांगतों हित। दृश्यांत न ठेवावें चित्त।। दृश्य वस्तु नाशिवंत असते। भगवत्कृपेने समाधान येतें।।

परिस्थिति नसे बंधनास कारण। असे आपलेच मनाची ठेवण ।। देवास पाहावें ज्या रीतीनें। तसाच तो आपणास दिसतो जाण।। विषयाचा नाही झाला जोंवर त्याग। तोंवर रामसेवा नाही घडत सांग।। आपलें आत्यंतिक हित। हेंच खरा स्वार्थ जाण।। चित्तीं जे विषयापासून सुटले। ते आनंदासी आले।। रामनाम प्रेमयुक्त चाले धणी। त्यासी म्हणती ब्रह्मज्ञानी ।। द्रव्यदारावर्जित जाण। ही खरी संताची खूण।। सृष्टि पाहावी भगवदाकारी । प्रेम ठेवील त्याचेवरी। त्याला नाही दुसरी सरी ।। आल्यागेल्यास द्यावे अन्नदान। मुखानें भगवंताचें नाम। हृदयांत रामाची प्रीति। यासच थोर म्हणती जीवन्मुक्ति ।। न धरावी जगाची आस। तोच होऊ पाहे रामदास।। नामांत संत । नामीं भगवंत ।। वृत्ति राखावी अत्यंत शांत । हेंच संतांचें मुख्य लक्षण जाण ।। जेथे भगवंताचें नामस्मरण । तेथे सर्व संतांचें ठाण।। अगरबत्ती जळून गेली। परि सुवासाने राहिली। तैसे रामचरणी झाले जे लीन । तेच खरे जिवंत जाण ।। संतचरणीं झाला लीन । त्याला भाग्यास नाही दुजें उणें। संताची संगति । भगवन्नामानें साधते ।। देहासकट माझा प्रपंच । रामा केला तुला अर्पण ।। ऐसें वाटत जावें चित्तीं । कृपा करील रघुपति ।।

# ॥ अनुभूती ॥

रामकृष्ण औसेकर
सिंहगड रोड, पुणे. मो. 98228 15640

## एक चैतन्य सूर्याचा अस्त जाहला



ज्योतिर्मय साहित्य

त्यांच खास वैशिष्ट्य म्हणजे प्रतिकुल परीस्थीतीला अनुकूल कसे करता येईल यातुन ते भक्तांना त्याचा मार्ग सुलभ करून देत असत. दुसऱ्याच्या कल्याणाचा मार्ग ते नेहमी शोधीत असत परंतु स्वतः त्यानी आपल्या प्रश्नाकडे गांभिर्याने कमी पाहिले नाही. राक्षसभुवनच्या देवस्थानचा आणि मठाचा जिर्णोध्दार कसा करावयाचा हाच एक मोठा विचार त्याच्या मनात असे.

दत्तसंप्रादाया मध्ये उपासनेला आणि साधनेला अतीशय महत्त्व महाराजांनी दिले होते. एकदा असाच प्रसंग मी सकाळीच महाराजांच्या दर्शनाला गेलो त्यांना सांगितले, तुमचं सिलेक्शन झालं आहे जावून या आणि तसं घडतही पण या संदर्भात मला पुढे पंधरा दिवस गाणगापुरला श्री दत्ताचे दर्शन घेवुन पुढे जावु असा विचार आला ह्या प्रमाणे मी सकळीच गाणगापुरला उतरलो, तेथे एक अनोळखी व्यक्ती भेटली, पंधरा एक वर्षाची असावी तो म्हणाला चला साहेब संगमावर स्थान ते करा मी आपली बँग कपडे सांभाळतो तो काही ऐकेना शेवटी आम्ही दोघे संगमावरील दत्ताचे दर्शन घेवुन आम्ही गावातील मुख्य दत्त मंदिरात आलो. मंदिरात आरती नैवेद्य झाला, पांच घर भिक्षा पण झाली, दत्त दर्शन चांगले झाले ते पण निर्गुण पादुकांचे, दोघांनी माधुकरीचा प्रसाद बाहेर येवून घेतला त्याने मला पण प्रसाद दिला. मी त्याची काहीच विचारपुस केली नाही.

अंगावर पंचा होता तसाच माझ्या समोर उभा म्हटला बाळ सकाळ पासून माझ्या बरोबर आहेस, परंतु त्याने पैसे पण घेतले नाहीत उलट मला गावाला जायला पैसे कमी पडत होते तेव्हा बँकेत कोणी ओळखीचे नसल्याने मला तेथे पैसे मिळाले नाहीत. शेवटी त्या मुलाला मी घड्याळ दिले व ते ठेवून कुणी पैसे देते का विचार म्हटले त्याने दोन चार ठिकाणी चौकशी केली पण व्यर्थ तेव्हां तो मुलगा म्हणाला गावांला जायला मी पैसे देतो आणि आश्चर्य म्हणजे त्यानी माझे तुळजापुर पर्यंतचे तिकीट काढून जागा मिळवून दिली. म्हटल त्याला बाबा पैसे पाठवून देईन त्याला नावं विचारले तेव्हां त्याने आपले नाव दत्तात्रय नडगीरे, असे सांगितले पुढे गावी आल्यावरश्री महाराजांना घडलेली हकीकत सांगितली महाराजांनी ताडत ते म्हणाले तुम्हाला दत्त महाराजांनी बाल रुपात दर्शन दिले, भाग्यवान आहात, मी गाणगापुरला ठरल्या प्रमाणे मनि ऑर्डर केली पण ती परत आली की या नांवाच इसम इथे नाही. पुढे काही दिवसांनी मी ताई महाराज (श्री महाराजांच्या मातोश्री) गाणगापुरला निघाल्या मी त्याच्या जवळ काही रक्कम माधुकरी साठी दिली गुरूकृपेमुळे परमेश्वर कुठल्या रूपात दर्शन देईल काही सांगता येत नाही. अज्ञानी जीवास याची जाण नसते.

**(क्रमशः)**



## आरोग्य संजीवनी

# अळीव

ज्योतिर्मय साहित्य

अळीव (गार्डन क्रेस सीड्स) ही खरी शक्तीची खाण!

हिवाळ्यात तर याची खीर एकदम अमृत शरीराला उब, सांध्यांना आराम, कंबरदुखी कमी, केसगळती थांबवते आणि हिमोग्लोबिन पटकन वाढवते.

आज करूया मऊ, रसरशीत, सुगंधी अळीव खीर - आरोग्य आणि चव दोन्हींचा परफेक्ट संगम

अळीव खीर (४ जणांसाठी - पौष्टिक आणि स्वादिष्ट!)

साहित्य

अळीव (हळवा बी) २ टेबलस्पून

दूध लिटर

साजूक तूप १ टीस्पून

गूळ कप (चवीनुसार अधिक/कमी)

वेलची पूड टीस्पून

किसलेला नारळ १ टेबलस्पून (ऐच्छिक)

बदाम/काजू १ टेबलस्पून (बारीक चिरून)

कृती-

१. अळीव फुलवणं खीर मऊ आणि पचायला हलकी करण्याचं रहस्य

एका वाटीत अळीव घ्या आणि कप कोमट पाण्यात १ तास भिजवा.

अळीव पाणी शोषून तुपासारखा मऊ, फुललेला दिसेल.

यामुळे खीर पोटाला हलकी आणि शरीराला जास्त फायदेशीर होते.

२. खीरचा बेस तयार करणं

कढईत १ टीस्पून तूप गरम करा.

भिजवलेला अळीव घालून हलकं परता (१ मिनिट).

आता त्यात दूध घाला आणि उकळी येऊ द्या.

मध्यम आचेवर ५-६ मिनिटं सतत ढवळत शिजवा.

दूधात अळीव छान मिसळला की खीर नैसर्गिकरित्या घट्ट होऊ लागते.

३. गुळाचा गोडवा आणि सुगंध

गूळ घाला आणि पूर्ण वितळू द्या.

वेलची पूड घाला.

हवं असल्यास नारळाचा खुगा किंवा ड्रायफ्रुट्स घालून आणखी २ मिनिटं शिजवा.

४. तयार! मऊसर, सुगंधी आणि पौष्टिक अळीव खीर

गॅस बंद करा आणि ५ मिनिटं झाकून ठेवा.

खीर बसली की अजून छान घट्ट आणि स्वादिष्ट होते.

सर्व्ह करताना गरम किंवा कोमट दोन्ही प्रकारे अप्रतिम.

हिवाळ्यात नाश्ता, जेवणानंतर किंवा रात्री झोपण्यापूर्वी एकदम जादूचा बाऊल.

खास टिप्स-

- अळीव नेहमी भिजवूनच वापरा पोटात सूज/जळजळ होत नाही

- गूळ वापरल्याने खीर आरोग्यदायी आणि उबदार लागते

- दुधाऐवजी कोकोनट मिल्क + गूळ वापरून वेगळी फ्यूजन चव मिळते

- हिमोग्लोबिन कमी असेल तर १०१२ दिवस दररोज वाटी खा. फरक दिसेल

अळीव खीर = चव + आरोग्य + ताकद!

सांधे, कंबर, केस, हिमोग्लोबिन सगळ्यांसाठी एकदम परफेक्ट पौष्टिक बेत.

***

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९



# लघु बोधकथा

आळशी करुणा

करुणा हुशार होती. परंतु आळशी होती. ती अभ्यास करायची. परंतु तोही आळस करुनच. ज्याची चिंता तिच्या मायबापाला पडली होती. एकदा करुणाच्या वडीलानं कोकिळेची कथा वाचली. कोकीळा आळशी असते. परंतु ती आपल्या गोड आवाजानं कावळ्याकडून काम करुन घेते. वडीलांनी करुणाला कोकिळेची गोष्ट सांगितली व सांगीतलं की आपला गुण जप. तरंच लोकं तुझं ऐकतील. लोकं अभ्यास करुन उच्च पदावर जातात. तेव्हाच त्यांना कुणीही साहेब म्हणतो व त्यांचं काम ऐकतो. ती कथा ऐकल्यावर करुणा काय समजायचं ते समजली व अभ्यास करु लागली. आज ती अधिकारी झाली होती व सर्व तिचं मुकाट्यानं ऐकून काम करीत होते.

बोध-

सर्वात मोठा अलंकार अभ्यास. ज्यानं आपलं जीवन सुशोभीत होत असतं.

# पद्मश्री जानकी तेवर

ज्योतिर्मय साहित्य

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील आझाद हिंद सेनेतील योगदानाबद्दल २००० साली जानकी तेवर (जानकी नहाप्पन) यांना भारत सरकारच्या वतीने पद्मश्री देण्यात आली. भारताबाहेर राहणा-या भारतीय वंशाच्या महिलांमध्ये पद्मश्री मिळविणाऱ्या पहिल्या स्त्री म्हणून त्या उल्लेखल्या जातात. हा पुरस्कार जरी त्यांना सामाजिक कार्य या क्षेत्रात कार्य करण्यासाठी दिला गेला असला तरी, जानकी तेवर यांचे भारतीय स्वातंत्र्यलढ्यामध्ये तसेच दक्षिण-पूर्व आशियातील भारतीय प्रवासी समाजातील महिलांना लष्करी प्रशिक्षण, शिस्त आणि स्वातंत्र्यलढ्याचे भान देण्यात त्यांनी जी महत्वाची भूमिका बजावली त्याचे महत्व यापाठीमागे होते. दुसऱ्या महायुध्दानंतर भारतीय मेडिकल मिशनच्या माध्यमातून युध्दग्रस्तांना मदत आणि त्यानंतर मलेशियन इंडियन काँग्रेस ची संस्थापक सदस्य म्हणून भारतीय समुदायाच्या राजकीय हक्कासाठी प्रयत्न ही जानकी तेवर यांची मोठी कामगिरी मानली गेली. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील कामगिरीबरोबरच मलेशियाच्या स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचा सहभाग स्पृहणीय होता. मलेशियाच्या स्वातंत्र्य आणि राष्ट्रनिर्मिती प्रक्रियेत सक्रीय भूमिका निभावत्यामुळे भारत आणि मलेशिया या दोन्ही देशाच्या ऐतिहासिक नोंदीमध्ये त्यांचे स्थान अव्वल दर्जाचे नोंदले गेले आहे. जानकी तेवर या मलेशियन संसदेच्या वरच्या सभागृहात सिनेटर राहिल्या आणि महिलांच्या प्रश्नांबाबत त्यांचा प्रभाव मान्य केला गेला.





९ जुलै १९४३ रोजी सिंगापूरच्या समुद्रकिना-यावर असलेल्या पंडागवर जमलेल्या ६०,००० भारतीय आणि भारतीय वंशाच्या लोकांच्या प्रचंड मोठ्या दमदार मेळाव्यासमोर नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी भारताच्या अखेरच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी संपूर्ण एकतेची' हाक दिली. या एकतेच्या कल्पनेत पुरुषांच्या जोडीनं संघर्षाच्या सर्व भूमिकांमध्ये स्त्रियांचाही सहभाग अपेक्षित असून राणी पलटणीच्या त्यांच्या योजनेचा त्यांच्या भाषणामध्ये विशेष भर होता. क्वालालंपुरमधल्या पडांग मैदानावर नेताजी भाषण द्यायला आले तेंव्हा आपल्या आई वडीलांना न सांगता जानकी तेवर आपल्या सायकलवरून त्या मेळाव्याला पोहोचल्या होत्या. नेताजींनी स्वयंसेवक आणि देणग्यांसाठी आवाहन केलं तेंव्हा त्या व्यासपीठावर गेल्या आणि आपली गळ्यातील सोन्याची चेन व कानातले काढून ते नेताजींना त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी अर्पण केले. त्यानंतर त्यांनी आपल्या आईवडीलांना गायब झालेल्या दागिन्यांविषयी समजू नये यासाठी ही घटना लपविण्याचा प्रयत्न केला. मात्र नेताजींना दागिनं काढून देतानाचा त्यांचा फोटो दुस-या दिवशी सकाळी स्थानिक वृत्तपत्रांमध्ये पहिल्या पानावर प्रसिद्ध झाला होता. त्यानंतर मूळ मद्रासच्या असलेल्या डॉक्टर लक्ष्मी स्वामीनाथन या नेताजी यांच्या संघटनेत सहभागी असलेल्या प्रमुख जानकी तेवर यांच्या घरी गेल्या. जानकी आणि त्यांच्या एका बहिणीनं राणी पलटणीसाठी नाव नोंदवलं आणि दोघी प्रशिक्षणासाठी घर सोडून सिंगापूरला गेल्या. जानकी तेवर यांचा जन्म २५ फेब्रुवारी १९२५ चा. १८ व्या वर्षीच आझाद हिंद सेनेत

प्रवेश केलेल्या जानकी तेवर या आपल्या समर्पित वृत्तीच्या आणि पोलादी व्यक्तीमत्वाच्या झोकून

देण्याच्या योगदानामुळे लक्ष्मी स्वामीनाथन यांच्या खालोखाल झाशीच्या राणी पलटणीच्या प्रमुख म्हणून उदयाला आल्या. शेवटच्या भारतीय स्वातंत्र्ययुद्धात लढण्यासाठी १२ जुलै १९४३ रोजी सिंगापूर इथं स्त्री सैनिकांची एक फौज अस्तित्वात आली. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली दुसऱ्या महायुद्धाच्या सबंध इतिहासात स्त्रीयांच्या नेतृत्वाखाली लढलेल्या स्त्रीयांच्या सैन्या एवढे जोरकस उदाहरण नाही. आझाद हिंद सेने मधल्या स्त्रीयांच्या पलटणीचं नांव झाशीची राणी पलटण (राणी ऑफ झाशी रेजिमेंट) असं नेताजींनी ठेवलं होतं. झाशीची राणी लक्ष्मीबाई हिच्या पावलावर पाऊल ठेऊन शब्दश: हजारो राण्या जन्माला आल्या. १२ जुलै १९४३ रोजी साडी नेसलेल्या परंतु हातात ३०३ ली-एनफील्ड रायफल्स घेतलेल्या चोवीस स्त्रीयांनी सिंगापूर इथं नेताजींसमोर समारंभपूर्वक गार्ड ऑफ ऑनरच प्रदर्शन केलं. त्यांच्या रायफलसना संगिनी जोडल्या होत्या. ही पलटण तयार झाली तेंव्हा नेताजींना जपानी लोकांनी बराच विरोध केला. अत्तावार यल्लप्पा यांनी नेताजींच्या आदेशाप्रमाणे आझाद हिंद सेने तल्या पुरुष अधिका-यांकडून स्त्रीयांना या संगिनी चालवायला शिकवलं होत. जपानी लोकांनी आणि विशेषतः त्यांच्या वरिष्ठ लष्करी अधिका-यांनी जेव्हा झाशीची राणी पलटणीचा लक्ष्य साधण्याचा सराव बघीतला तेंव्हा ते आश्चर्यचकीत झाले. स्त्री सैनिक बाळगण्याचा आझाद हिंद सेनेचा प्रस्ताव त्यांना खुळचटपणाचा आणि दारूगोळा वाया घालवणारा आहे असे वाटत होते. पण जेंव्हा या पलटणीतल्या स्त्रीया नेमबाजीत आणि संगिनी चालवण्यातदेखील चांगल्या माहीर झालेल्या बघीतल्या तेंव्हा नाईलाजाने त्यांना नेताजींच म्हणणं मान्य करावं लागल. नेताजींनी सर्वांना सांगितल कि, ''राष्ट्रीय संघर्षात जोवर भारतीय स्त्रीया आपल्या वाटेला आलेली भूमिका निभावत नाहीत तोवर भारताला स्वातंत्र्य मिळण्याची आशा नाही अशी माझी खात्री झाली आहे. खांद्यावर बंदूक घेणं स्त्रीयांना शोभत नाही असं जर कोणाला वाटत असेल तर त्यांनी इतिहासाची पानं उलगडून बघावीत अशी माझी त्यांना विनंती आहे. १८५७ सालच्या उठावात भारताच्या पहिल्या स्वातंत्र्यलढ्यात झाशीच्या शूर राणीनं काय केलं? त्या थोर राणीचं कार्य पुढे नेऊन आपल्याला ते पूर्ण करायचा आहे म्हणूनच या अखेरच्या स्वातंत्र्य युद्धात आपल्याला एक नव्हे तर हजारो झाशीच्या राण्या हव्यात.'' भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात स्त्रीयांचा सन्मान आणि सक्रीय सहभाग असावा याचा ते १९२० सालच्या उत्तरार्धापासून पुरस्कार करत होते. नेताजी यांच्या सूचनेप्रमाणे १९४३ च्या ऑक्टोबर महिन्यापर्यंत साडीऐवजी खाकी ऐटबाज गणवेश राणी पलटणीने परिधान केला. जोधपुरी चोळणा, त्यात खोचलेले बुशशर्ट आणि काळी बकल्स असलेले बूट असा तो गणवेश होता. ऑक्टोबर १९४३ मध्ये सिंगापूरच्या वॉटरलू रोडवर ५०० महिलांसह राणी झांसी रेजिमेंटची कॅप्टन लक्ष्मी स्वामीनाथान यांच्या नेतृत्वाखाली जी परेड झाली त्यामध्ये जानकी तेवर या कॅप्टन लक्ष्मी यांच्या नंतरचे प्रमुख म्हणून गणल्या जात होत्या. या सर्वजणी रायफल, मशीनगन, हातग्रेनेड आणि रणनीतीचे कठोर प्रशिक्षण घेतलेल्या होत्या.

जानकी तेवर यांनी मलयन वृत्तपत्रात १८व्या वर्षीच १९४३ साली लिहिले, ''आम्ही कोमल आणि सुंदर असु शकतो पण कमकुवत या शब्दाचा मी निषेध करते. पुरुषांच्या स्वार्थासाठी दिलेले हे शब्द आम्हाला पुरुषांच्या साखळ्या आणि भारतीय गुलामगिरीच्या साखळ्या दोन्ही तोडण्याची वेळ आली आहे.'' एप्रिल १९४४ मध्ये बर्मा आघाडीवर जेव्हा कॅप्टन लक्ष्मी स्वामीनाथन जखमी झाल्या तेंव्हा १९ वर्षीय जानकी तेवर यांना बर्मा दस्त्याचे कॅप्टन आणि सेकंड इन कमांड बनवले गेले. त्यांच्या कठोर शिस्तीचे नेतृत्व आणि सहभाग राणी पलटणी प्रोत्साहित करत असे.



शिरीष चिटणीस
सातारा मो. 75888 65051

सर्व सहकारी सैनिक त्यांचा सन्मान करीत. १९४४ पर्यंत झाशीची राणी पलटणीमध्ये सुमारे १५०० सैनिक होते. रंगुनच्या रेड क्रॉस हॉस्पिटलवर ब्रिटिश बॉम्बिंगमध्ये जखमी सैनिकांना त्यांनी वाचविले. एप्रिल १९४५ च्या उत्तरार्धात ब्रम्हदेशातून माघार घेत असताना झाशीची राणी पलटणीची चांगलीच कसोटी लागली. ब्रिटिशांचं लष्कर रंगूनकडे येत असताना जवळजवळ अखंड हवाई मारा चालू होता. त्या माऱ्याला तोंड देत ही माघार घ्यावी लागली होती. राणी पलटणीतल्या स्त्रीयांना रेल्वेनं रंगूनमधून बाहेर काढायचं आणि मग नेताजी गाडीनं शहर सोडतील असा सुरवातीला बेत होता. मात्र रेल्वे स्थानकावर बराच काळ वाट पाहिल्यानंतर एवढ्या मोठ्या राणी पलटणीला ट्रेनमध्ये जागा नाही असं सांगण्यात आल्यावर नेताजी खूप संतापले. कारण २३ एप्रिल १९४५ पर्यंत रंगूनचा पाडाव होऊन ब्रिटिश रंगून ताब्यात घेणार हे स्पष्ट दिसत होते. यथावकाश २४ एप्रिल १९४५ रोजी राणी पलटणीने आणि नेताजींनी रंगून शहर सोडले आणि बँकॉकपर्यंतच्या माघारीला सुरुवात झाली. आझाद हिंद सेनेचे उच्चपदस्थ अधिकारी आणि झाशीची राणी पलटणीत शेकडो स्त्री सैनिक नेताजी यांच्या बरोबर होत्या. मे च्या पहिल्या आठवड्यात ब्रिटिश फौजा रंगूनमध्ये येइपर्यंत आझाद हिंद सेने ने भारतीय लोकांच रक्षण करायचेही काम केले. या खडतर माघारीच्या काळात राणी पलटणीच्या एकवीस वर्षे वयाच्या कमांडिग अधिकारी जानकी तेवर डायरी लिहित होत्या. ७ मे १९४५ रोजी झाशीची राणी पलटणीतल्या शेकडो सैनिक बँकॉकला पोहोचल्या. नेताजी ६ मे लाच बँकॉकला पोहोचले होते. त्यांनी सर्व सैनिक मुलींसाठी अन्न, स्वच्छ कपडे, आणि राहण्याची व्यवस्था करून ठेवली होती.

१२ ऑगस्ट १९४५ रोजी लेफ्टनंट जानकी तेवर यांनी नेताजींच्या सिंगापूरच्या घरी जाऊन हजेरी दिली. बँकॉकमध्ये काही आठवडे काढून नेताजी सिंगापूरला आझाद हिंद सेनेच्या आणि झाशीची राणी पलटणीच्या जन्मस्थानी परतले होते. आशिर्वादासाठी नेताजींनी आपला उजवा हात जानकी तेवर यांच्या डोक्यावर ठेवला आणि आशिर्वाद दिला.जानकी यांनी नेताजींना १४ ऑगस्टला संध्याकाळी सादर करत असलेल्या नाटकाच्या प्रयोगाला यायचं आमंत्रण दिलं. १८५७-५८ च्या पहिल्या स्वातंत्र्यलढ्यातल्या राणी लक्ष्मीबाईंच्या शौर्यावर आणि हौतात्म्यावर हे नाटक घेतलेलं होतं. जनरल भोसले यांचे ए.डी.सी.

पी.एन. ओक यांनी हे नाटक लिहिंल होतं. नाटक सुरू झाल्यावर लवकरच नेताजी कार्यक्रमस्थळी पोहोचले. टाळ्यांच्या गजरात अधिकारी आणि सामान्य सैनिक मिळून आयएनए चे सुमारे ३००० लोक उपस्थित होते. प्रयोग संपताना सर्व जमावाने सन १९४३ पासून स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारच राष्ट्रगीत शुभ सुख चैन की गायले.

युद्ध संपल्यानंतरही एकही राणी मागे हटली नाही असे ब्रिटिश अधिका-यांनी लिहून ठेवले आहे. काही काळ सर्व राणी सैनिक ब्रिटिशांच्या कैदेत होत्या.

आझाद हिंद सेनेच्या सर्व सैनिकांना १९४५ नंतर टप्प्याटप्याने मुक्त करण्यात आले. यानंतर जानकी मलाया येथे इंडियन काँग्रेस मेडिकल मिशनमध्ये सामील झाल्या. १९४६ मध्ये जॉन थिव्ही यांच्यासोबत मलायन इंडियन काँग्रेस स्थापनेत जानकी आघाडीवर होत्या. ज्यामुळे मलेशियातील भारतीयांच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व त्यांच्यामुळे झाले. १९४८ मध्ये जानकी तेवर यांची तमिळ दैनिक तमिळ नेसनचे संपादक अथी नहाप्पन भेट झाली आणि १९४९ मध्ये त्यांचे लग्न झाले. गर्लगाईड असोसिएशन आणि नॅशनल कौन्सिल ऑफ वुमेन्स ऑर्गनायझेशन सारख्या संस्थामध्ये त्या सक्रीय होत्या. मलेशियाच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानासाठीही जानकी यांना अनेक पुरस्कार मिळाले. जानकी यांचे जीवन महिलांच्या सक्षमीकरणाचे प्रतीक ठरले. युद्धभूमीपासून राजकारणापर्यंतचा प्रवास याची ऐतिहासिक नोंद जानकी यांची जागतिक पटलावर आहे. जानकी तेवर यांचे क्वालालंपूर येथे ९ मे २०१४ रोजी वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झाले. राणी पलटणीतली दोन वर्षे या भूतलावर आपल्या आयुष्याला वळण देणारी ठळक वर्ष होती अस जानकी म्हणत. नेताजी रिसर्च ब्यूरोच्या उपक्रमांशी आणि कार्यक्रमाशी अनेक दशकं जानकी जोडलेल्या होत्या. कलकत्त्यामधील नेताजी सेंटरला २३ जानेवारीला नेताजींच्या जयंतीला त्या वारंवार येत असत. २३ जानेवारी १९७९ रोजी नेताजींच्या जयंतीनिमीत्त डॉ. शिशिर बोस यांच्या नेतृत्वाखाली काम करणा-या नेनाजी रिसर्च ब्यूरो मार्फत नेताजी भवन कलकत्ता येथे झाशीची राणी पलटणीतल्या स्त्री सैनिकांचा मेळावा आयोजित केला होता. जानकी तेवर (नहप्पन) क्वालांपूरवरून आणि लक्ष्मी स्वामीनाथन (सहगल) सर्वांना मार्गदर्शन करण्यासाठी आल्या होत्या. त्या म्हणाल्या नेताजींमुळे आमच्या आयुष्यात प्रयोजनाचा आणि अस्मितेच्या जाणीवांचा शिरकाव झाला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतातील तरुणाईपुढे नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यासारखे आदर्शवादी नेतृत्व उभे राहिले नाही ही एक शोकांतिकाच आहे.

***




## श्रीशैलमल्लिकार्जुन

ज्योतिर्मय साहित्य



ते म्हणाले, हे महादेव, या पृथ्वीवरील सर्वोच्च शक्तीचे स्थान कोठे आहे? ज्यातून भोवतालची सर्व शक्ती, कल्याण, दान, सिद्धी व मुक्तीचा मार्ग प्रवाहित होईल? त्यावर शिव म्हणाले ''हे ब्रह्मा, जिथे मी व पार्वती स्वतः वास करू ते. जिथे प्रकृतीशी आणि शक्तीशी माझे एकत्रीकरण असेल ते.ते स्थान सर्व तीर्थां पेक्षा श्रेष्ठ असेल.क्रौंच पर्वताच्या दक्षिणा तीरावर जिथे पर्वत कमळा सारखा दिसतो. तिथे माझे मल्लिकार्जुन आणि देवीचे ब्रह्म रंभा रूप प्रगट झाले आहे. ते स्थान सर्वात पवित्र अद्भुत आणि दैवी आहे.

२) एकदा ब्रह्मदेवाला अशी जाणीव झाली की, सृष्टीत निर्माण केलेल्या अनेक गोष्टींना तृप्ती नाही. काही दैत्य, काही मनुष्य, काही देवही, स्वतःच्या कर्माने संतुष्ट नाहीत. म्हणून ब्रह्मदेवाने सृष्टीतील सर्व रोग निवारण, सर्व दुःख निवारण, व अद्वैतानुभवाचे मूळ स्थान, एक असावे म्हणून, त्यांनी नर्मदा तुंगभद्रा नद्यांच्या संगमा जवळचे पर्वताच्या पायथ्याशी दीर्घ तप केले. तपोबल वाढल्यावर ब्रह्मतेज तेजोबिंदू बनून आकाश मार्गे ते वर गेले, तेव्हा तिथे शिव प्रकट झाले. ते ब्रह्मास म्हणाले तुझे तप विश्वास उपकारक आहे. तू जिथे तप केलेस, ते स्थान दिव्य तेजस्वी( म्हणजेच अर्जुन) आणि मल्लिका शक्ती या रूपात मी आणि पार्वती धारण करू. इथे येणाऱ्या भक्तांचे दैन्य, दुःख, संकटे निवारण केल्या जातील.

३) अन्य एका कथेनुसार एकदा शिव आणि पार्वती यांची मुले श्री गणेश व श्री कार्तिकेय यांच्यात कोण विवाह आधी करतो म्हणून चर्चा सुरू झाली. दोघांनाही आपला विवाह आधी व्हावा असे वाटू लागले. त्यानंतर त्यांचे असे ठरले की, जो संपूर्ण पृथ्वीला प्रदक्षिणा मारून येईल त्याने आधी विवाह करावा. कार्तिकेय यांनी आपल्या मोर या वाहनावर बसून प्रदक्षिणा घालण्यास सुरुवात केली. गणेशांनी आपले वाहन उंदीर आहे हे पाहून मोरापेक्षा गतिमान आपणास होता येणार नाही म्हणून, केवळ आपल्या बुद्धीचा वापर केला. त्यांनी आपल्या माता पित्यांसच प्रदक्षिणा घातली. व जे पुण्य पृथ्वी प्रदक्षिणेने मिळते, तेच पुण्य मातापित्यांना प्रदक्षिणा घालूनही मिळते असे मत प्रकट केले. त्यास महादेवांनी होकार भरला व सर्वात आधी पृथ्वी प्रदक्षिणा पूर्ण झाली म्हणून श्री गणेशांचा विवाह रिद्धी व सिद्धी या दोघींशी झाला.

(क्रमशः)

# आज फिर जीने की तमन्ना है

ज्योतिर्मय साहित्य



सुजय चे काम आता चालू झाले राजकारण, दौरे, कार्यक्रम, कार्यकर्ते ह्यात तो पुरा अडकून पडला. शांभवी कित्येक रात्री उशिरापर्यंत वाट पाहून न जेवता झोपून जाऊ लागली. अचानक एका रात्री सुजय जिकडे बाहेरगावी गेला आहे तिकडे दोन दिवस राहणार आहे असा फोनवरून निरोप आला. तो फोन कुठल्या तरी कार्यकर्त्यांनी केला होता शांभवी जरा गोंधळात पडली कारण सुजय ह्या अगोदर कधी न सांगता बाहेर राहिला नाही सकाळी उठल्यावर तिने सुजय दोन दिवसांनी परत येईल असे घरी सांगितले. सुजयची आई जरा जास्तच काळजी करू लागली.

दोन दिवस झाले तरी सुजय काही परतला नाही. सुजयच्या दादा वहिनीला मात्र काहीच वाटत नव्हते. शांभवीच्या जीवात जीव नव्हता, ती आणि आई सारख्या देवापुढे हात जोडत होत्या काही कार्यकर्ते सुजय गेला त्या गावात शोध घेऊन आले पण काही पत्ता लागला नाही. सुजयचा फोन देखील बंद होता तो ज्याठिकाणी जाणार होता तिथे तो पोहचला नाही. पोलिस आले चौकशी सुरू झाली. इकडे निवडणूक जवळ म्हणून सुजयचा दादा निवडणूक लढवणार असे ठरले. घरी मात्र सुजय नसण्याने दुःखद वातावरण, शांभवी पार कोलमडून पडली होती. आई बाबा भेटायला आले तर खूप रडली तिची अवस्था बघवत नव्हती.

सुजय नेमका कोठे गेला ह्याचा शोध लावायला पोलिस निरीक्षकांना फोन केला होता. त्यांनी तातडीने त्यामध्ये लक्ष घातले. सुजय ज्या दिवशी बाहेर पडला त्या दिवशी दिवसभर एका गावात कार्यक्रम होता तो त्या ठिकाणी गेला होता पण त्यानंतर संध्याकाळी तो कोणास दिसला नाही पुढे तासाभरात एका वाडीत जाऊन फक्त भेट घेऊन परत फिरायचे होते म्हणून तो चारचाकी गाडी नको म्हणाला, रस्ता चिंचोळा पण फार लांब नव्हता म्हणून त्याने दुचाकी वरुन जाण्याचे ठरवले. दोन्ही बाजूंनी दाट झाडी डोंगर आणि छोटीशी पायवाट ह्यातून तो गेला. काही कार्यकर्ते मागून गेले पण तोवरच सुजय दिसेनासा झाला.. अशी माहिती पोलिसांना मिळाली. शांभवीला आलेला फोन कोठून आला ते पाहिले तर तो एका कार्यकर्त्यांचा फोन होता. पण तो कार्यकर्ता ही गायब झाला होता. साऱ्या गोष्टी चक्रावून टाकणाऱ्या होत्या पण तपास चालू होता.



सौ.प्रतिभा महादेव चौगले
कोल्हापूर मो. 95525 61612

इकडे सासरे आजारपणामुळे खचले आणि सुजय दिसत नाही म्हणून अजूनच प्रकृती गंभीर झाली. आईच्या डोळ्यातील पाणी हटेना.. शांभवी एकदम शांत झाली. घर उदासीन झाले फक्त दादा आणि वहिनी तेवढे घरातील खोल्यांमध्ये वावरत होते आणि आपल्या खोलीत जाऊन काही तरी गौप्यपणे बोलत होते, घरात काम करणाऱ्या विमल ताईंना राहून राहून संशय यायचा कारण थोरल्या दादाला ती लहान पणापासून ओळखत होती.

विमलताई एकदा शांभवीकडे गेली आणि तिने धाडसाने शांभवीला सांगितले'' तुम्ही दादासाहेब व वहिनी वर पाळत ठेवा मी देखील कामानिमित्त त्यांच्या खोलीत जाऊन नेमकं त्यांच काय चाललंय हे पाहते''. शांभवी उदास झाली होती पण ती तयार झाली आणि जेवताना, स्वयंपाक घरात ज्यावेळी वहिनी जवळ असतील तेव्हा बारकाईने नजर ठेवत होती आणि विमल ताईंना दादासाहेबांच्या टेबलावर एका रिसॉर्टचे कार्ड सापडले. ते त्यांनी साफसफाई करताना पाहिलं आणि हळूच पदरात बांधून बाहेर आणलं आणि शांभवीला आणून दिले. शांभवीने रेसार्टचा फोन लावला तर ते सुजय ज्या ठिकाणी गेला होता तिकडेच होते.

(क्रमशः)












# देवभूमी - केरळचे अलौकिक सौंदर्य

ज्योतिर्मय साहित्य

एकदा आमचे पिकनिकला केरळला जायचे ठरले. तेंव्हा माझ्या मिस्टरांनी मला सांगितले की केरळ देवाची स्वतःची भूमी (गॉडस् ओन कंट्री) म्हणुन प्रसिद्ध आहे. हे कळल्यापासूनच आम्ही केरळ पाहण्यासाठी खूपच अधीर झालो होतो. देवाची भूमी म्हणजे तेथील सौंदर्य अलौकिकच असणार. पहाटेची फ्लाइट असल्याने रात्रीच एअरपोर्टवर पोहोचलो. खूप उत्साहात होतो. पुणे ते कोइंबतूर विमानप्रवास करून आम्ही कोइंबतूर एअरपोर्ट वर पोहोचलो.

एअरपोर्ट पासून सुमारे तीन ते चार तासांचा प्रवास करून आम्ही कांतालूर या सुंदर डोंगरावर असलेल्या गावी पोहोचलो. एक छोटेसे पण अगदी परिकथेतील वाटावे इतके छान रिसॉर्ट होते. रूमच्या भिंतीवर हरीण, ससा, फुले अशी अनेक प्राण्यांची व फुलांची चित्रे काढलेली होती. मागच्या बाजूला गॅलरी होती. तिथे बसायला खुर्च्या ठेवल्या होत्या. तिथून थोडय़ा अंतरावर डोंगर होते. डोंगरावर खूप सारी झाडी आणि धुके दिसत होते. आजुबाजूला गार गार वारे. तिथली ती धुक्यातली सकाळ मी कधीच विसरणार नाही. कौलारू छतावरून थोडी खाली आलेली गवताची पाती त्या गॅलरीला आणि रिसॉर्टला एक कलात्मक रूप देत होते. समोरच्याच झाडांवर पक्षांची किलबिलाट सुरू होती. आम्ही गरम गरम चहा पीत समोरचे निसर्ग सौंदर्य पाहत बसलो होतो. अचानक डोंगरातून एक गाणे म्हणल्याप्रमाणे शिटी वाजवल्याचा आवाज येत होता. मी म्हटलं किती सुरात मस्त शिटी वाजवत आहेत. माझ्या मिस्टरांनी पण कुतूहलाने तिथल्या लोकांना विचारले तर ते म्हणाले हा माणूस नाही एक पक्षी शिटी वाजवतोय. हे ऐकून आम्ही आश्चर्यचकित झालो. निसर्गात बसून निसर्गाचेच मोहक संगीत ऐकण्यात आम्ही रमून गेलो.

थोड्या वेळाने तिथे अजून एक गरुड पक्षी दिसला. तो थोडा लांब झाडावर होता. आम्ही कौतुकाने तो पाहात होतो. तेवढ्यात तिथला एक मुलगा म्हणाला त्याचे नाव गुरू आहे. मी म्हटलं अरे वाह. तो मुलगा पुढे म्हणाला त्याला हाक मारल्यावर तो येतो. आणि हे ऐकून आम्हाला खूप आश्चर्य वाटले. त्याने त्याला गुरू म्हणुन हाक मारली. आणि खरच तो आला. आम्ही खूप आनंदित झालो. माझ्या मिस्टरांनी गुरुला हातावर, खांद्यावर, डोक्यावर बसवून फोटो पण काढले.

तिथून माझा पाय निघतच नव्हता. पण पुढची ठिकाणे पाहण्यासाठी आम्ही दुसऱ्या दिवशी निघालो आणि मुन्नारला पोहोचलो. तिथली आखीव रेखीव चहाची शेती आणि ती ही उंचच उंच पर्वत रांगांवर. मी पहिल्यांदाच पाहत होते. घाटातील वळणदार रस्ता आणि दोन्ही बाजूला चहाच्या एकसारख्या उंचीच्या रोपांनी नटलेले पर्वत. खूपच विलोभनीय रस्ते होते.

आम्ही सूर्यास्त पाहण्यासाठी खूप उंच पर्वतावर गेलो. आणि वर इतके सुंदर दृश्य होते. समोरच थोडे खाली नजर जाईल तिथपर्यंत पर्वत रांगा आणि खोलच खोल दऱ्या होत्या. त्यात पांढरेशुभ्र ढग फिरत होते. आणि समोरच आकाशात आकाराने एकदम मोठे नारिंगी रंगाचे सूर्यदेव. त्यांच्या आजूबाजूला लाल,



पिवळा, तांबडा, निळा, अशा अनेक रंगांची आकाशात उधळण झालेली दिसत होती. प्रत्येक क्षणाला थोडे थोडे खाली सरकणारे सूर्यदेव आणि आजुबाजुला बदलत जाणारे आकाशातील रंग. खूपच नयनरम्य दृश्य होते.

दुसऱ्या दिवशी आम्ही चहाची फॅक्टरी पहिली तिथे आम्हाला चहा बद्दल बरीच माहिती नवीन कळाली. येथे चहाच्या लागवडीपासून प्रक्रिया आणि उत्पादनापर्यंतचा प्रवास माहितीपट, जुनी यंत्रसामग्री आणि छायाचित्रांच्या माध्यमातून दाखवला जातो. नंतर आम्ही मुन्नार मधील बोटॅनिकल रोझ गार्डन पाहायला गेलो. बोटॅनिकल रोझ गार्डन हे पर्यटकांचे खास आकर्षण मानले जाते. उंच पर्वतरांगा, धुक्याची चादर आणि रंगीबेरंगी फुलांचा साज यामुळे हे उद्यान फुलप्रेमी, छायाचित्रकार आणि निसर्गभ्रमंती करणाऱ्या प्रत्येकासाठी अविस्मरणीय ठरते. मुन्नार शहरकेंद्रापासून काही किलोमीटर अंतरावर हे रोझ गार्डन वसलेले आहे. डोंगरउतारांवर टेरेस पद्धतीने विकसित केलेले हे उद्यान पाहताना पर्वत, दरी आणि फुलांचा अद्भुत मिलाफ अनुभवायला मिळतो.



शीतल गायकवाड, पुणे.
(मोबाईल : 9923175624)

नाव रोझ गार्डन असले तरी येथे केवळ गुलाबच नाही, तर शेकडो प्रकारची फुलझाडे, शोभिवंत झुडपे, वेलवर्गीय वनस्पती आणि औषधी झाडे पाहायला मिळतात. विविध रंगांच्या आणि आकारांच्या हजारो गुलाबझुडपांबरोबरच लिली, ऑर्किड, डेहलिया, क्रायसॅन्थिमम, हिबिस्कस आणि कॅक्टससारख्या वनस्पतींनी संपूर्ण आवार रंगीबेरंगी झाल्यासारखे भासते. याशिवाय काही दुर्मीळ प्रजातींच्या फुलांमुळे वनस्पतिशास्त्र आवडणाऱ्यांसाठीही हे ठिकाण अभ्यासासाठी उपयुक्त ठरते. येथे ठिकठिकाणी लाकडी बाक बसण्यासाठी ठेवलेले होते. त्यावर निवांत बसून डोंगरउतारांवरून दिसणारे विस्तीर्ण दृश्य, टेरेस स्वरूपातील बागेतील स्तर पाहण्यात आम्ही हरवून गेलो. प्रत्येक वळणावर फुलांनी सजलेली कमानी, छोट्या रचना आणि सुबकपणे लावलेल्या कुंड्या यामुळे हे उद्यान जणू स्वर्गच वाटते.

फुलांमध्ये हरवलेलं डोंगररान थंड वाऱ्यांमध्ये झुलणारी फुलझाडे, ढगांच्या दुलईखाली विसावलेले डोंगर आणि हिरव्यागार चहाच्या मळ्यांच्या सान्निध्यात वसलेले हे बोटॅनिकल रोझ गार्डन मुन्नारच्या सौंदर्याला आगळा वेगळाच साज चढवते. केरळभ्रमंतीत मुन्नारला भेट देताना फुलांची आवड असो किंवा केवळ निसर्गात काही शांत क्षण घालवायची इच्छा, या उद्यानाला भेट देणे हा नक्कीच समृद्ध करणारा आणि मनाला प्रसन्न करणारा अनुभव ठरतो. दोन दिवस मुन्नार मध्ये राहून नंतर आम्ही अलेप्पीला गेलो. अलेप्पीच्या परिसरात अरबी समुद्रकिनारा, वेंबनाड सरोवराचे बॅकवॉटर, कालवे, तलाव आणि हिरवीगार भातशेती यांचा सुंदर मिलाफ होता. उंच नारळाच्या झाडांच्या रांगा, शांत पाणवाटा आणि लहान बेटं यामुळे या भागाला ''पूर्वेचं व्हेनिस'' अशी ओळख मिळाली आहे. आम्ही बोटीने एका बेटावर गेलो होतो. तिथल्या नीरव शांततेत, निसर्गात आपण स्वतःला विसरून जातो. नारळाच्या दाट रांगा, तलाव, कालवे आणि भातशेती यांच्या संगतीत हाऊसबोटची सफर हाही एक अविस्मरणीय अनुभव ठरला. नंतर आम्ही अलेप्पी बीच, जुनं दीपगृह आणि आसपासचे मंदिरे व राजवाडे पाहिले. नंतर अलेप्पी मध्ये एक दिवस राहून आम्ही कोची ला गेलो. कोची (जुने नाव कोचीन) हे केरळ राज्यातील एर्नाकुलम जिल्ह्यातील एक महत्त्वाचे सागरी बंदर शहर असून ते राज्याची आर्थिक आणि व्यावसायिक राजधानी म्हणून ओळखले जाते. कोची मध्ये आम्ही भारतीय नौदल सागरी संग्रहालय पाहायला गेलो. हे संग्रहालय भारताच्या समुद्री इतिहासाचा आणि नौदलाच्या गौरवशाली परंपरेचा एक समृद्ध दाखला आहे. या संग्रहालयात भारतीय नौदलाच्या विविध टप्प्यांचे दर्शन घडते, प्राचीन सागरी व्यापारापासून आधुनिक नौदल ताफ्यापर्यंत. येथे जुन्या जहाजांचे मॉडेल्स, नकाशे, शस्त्रे, नौकानयन उपकरणे, आणि छायाचित्रांच्या माध्यमातून भारताच्या सागरी सामर्थ्याचा प्रभावी परिचय दिला आहे.

बाहेरील अंगणात ठेवलेली तोफखाना, टॉर्पेडो, जुनी तोफ आणि युद्धनौकांची मॉडेल्स पाहताना अरब व्यापारी, पोर्तुगीज, डच आणि ब्रिटीशांचा सागरी व्यापाराचा काळ जणू जिवंत होतो आणि कोची कसे एक महत्त्वाचे बंदर बनले, याची जाणीव होते. आतल्या दालनात १९७१ च्या युद्धातील ऑपरेशन ट्रायडंटसारख्या कारवायांचे दृश्य, भारतीय नौदलाच्या गणवेशांचे नमुने, पदकं, नकाशे आणि भिंतींवर कोरलेली कथाचित्रे पाहताना प्रत्येक भारतीयाच्या मनात अभिमानाची लहर निर्माण होते. शेवटी लॉनमध्ये उभा असलेला सेवामुक्त हेलिकॉप्टर आणि युद्धनौकांच्या सूक्ष्म प्रतिकृतींच्या सान्निध्यात बसून, अरबसागराच्या वाऱ्यासोबत मिसळलेला समुद्री मिठाचा वास घेत आपण संग्रहालयातून बाहेर पडतो, पण मन मात्र भारतीय नौदलाच्या शौर्यकथांतच रेंगाळत राहते.

कोची मधले वातावरण खूपच चैतन्यमय होते. बॅकवॉटर्स, चायनीज फिशिंग नेट्स, सेंट फ्रान्सिस चर्च व फोर्ट कोची यांसारखी ऐतिहासिक ठिकाणे पहिली. तिथला प्रसिद्ध लूलू मॉल पहिला. आधुनिक पायाभूत सुविधा आणि सांस्कृतिक वारशाचा सुंदर संगम म्हणजेच कोची. कोची मध्ये एक दिवस राहून आम्ही पुण्याला परत आलो केरळचे सुंदर अलौकिक निसर्ग सौंदर्य पाहिल्यावर मन प्रसन्न होते. देवाची स्वतःची भूमी का म्हणतात हे केरळला भेट दिल्यावरच कळते.

# न्यायाच्या प्रतीक्षेत...

ज्योतिर्मय साहित्य



कराडच्या एका महाविद्यालयात सकाळ नेहमीसारखीच सुरू झाली होती. वर्ग, अभ्यासक्रम, प्राचार्यांच्या दालनातील कागदपत्रांचा ढीग आणि त्या ढिगाऱ्यात एक फाईल शांतपणे पडून होती करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम अंतर्गत प्राध्यापक पदोन्नतीची...

डॉ. भरत बजरंग बल्लाळ.

नाव ओळखीचं. शिक्षणक्षेत्रात वर्षानुवर्षे प्रामाणिकपणे काम केलेलं. कायद्याने आणि नियमांनी ठरवून दिलेल्या सर्व अटी पूर्ण केलेल्या. सहप्राध्यापक (शैक्षणिक स्तर १३ए) म्हणून आपला प्रवास पार पाडत, त्यांनी प्राध्यापक (शैक्षणिक स्तर १४) पदोन्नतीसाठी अर्ज केला होता. कुठलाही अपवाद नाही, कुठलीही सवलत नाही फक्त नियमांनुसार पुढचे पाऊल.

परखड...
सतीश इंदापूरकर
पुणे 96231 14393



सीएएस च्या तरतुदींनुसार गठित केलेल्या दहा सदस्यीय निवड समितीसमोर तो अर्ज गेला. समितीने सखोल विचार केला, कागदपत्रे तपासली, शैक्षणिक गुणवत्ता पाहिली आणि अखेर एकमताने निर्णय दिला डॉ. बल्लाळ पदोन्नतीस पात्र आहेत... कथा इथे संपायला हवी होती. पण इथूनच ती सुरू झाली.

कथितरित्या मत्सरातून, द्वेषातून काही अनामिक तक्रारी दाखल झाल्या. नाव नाही, ओळख नाही तरीही तक्रारी. नियम स्पष्ट होते : अशा तक्रारींची दखल घ्यायची नाही. पण तरीही शिवाजी विद्यापीठाने कायद्याने अधिकार नसलेली दोन सदस्यीय समिती गठित केली. आणि त्या समितीने विधिवत गठित दहा सदस्यीय निवड समितीची शिफारस फेटाळून लावली.

एक शैक्षणिक निर्णय मनमानीचा बळी ठरला.

न्यायाच्या शोधात, पदाच्या नव्हे तर तत्त्वांच्या रक्षणासाठी, डॉ. भरत बल्लाळ यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट खंडपीठाचा दरवाजा ठोठावला. रिट याचिका दाखल झाली.

ही याचिका माननीय न्यायमूर्ती एम. एस. कर्णिक आणि माननीय न्यायमूर्ती अजित बी. कडेठणकर यांच्या खंडपीठासमोर सुनावणीस आली. प्रतिवादींकडून ज्यात शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू यांचाही समावेश होता. न्यायालयाला सांगण्यात आले की तक्रार निवारण समितीमार्फत विचार सुरू असून १७ डिसेंबर २०२५ रोजी सुनावणी निश्चित आहे.

न्यायालयानेही प्रक्रियेचा आदर राखत, प्रतिवादींना कुलगुरू व इतर संबंधितांना १२ जानेवारी २०२६ पर्यंत प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश दिले.

या संपूर्ण कायदेशीर लढ्याच्या मागे एक संयमी पण ठाम पथक उभं होतं. ॲड. राजेंद्र केडगे, ॲड. सुनील यादव, ॲड. संतोष कालोखे, ॲड. उमंग यादव, ॲड. अर्चना केडगे आणि ॲड. स्नेहा घाटगे यांनी सखोल कायदेशीर संशोधनाच्या आधारे, माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचा आधार घेत, ही याचिका अत्यंत काटेकोरपणे उभी केली. ही आणि अशा अनेक कथा अजून संपलेल्या नाही. ही कथा एका पदोन्नतीची नाही तर ती नियम, न्याय आणि शैक्षणिक स्वायत्ततेच्या कसोटीची आहे... खरं तर शिक्षण क्षेत्रात तरी कायद्यानुसार काम करण्यासाठी कोणालाच असा त्रास होऊ नये असे अगदी मनापासून वाटते...

# रस्ते अपघातातील बळींची संख्या चिंताजनक

ज्योतिर्मय साहित्य

उत्तर प्रदेशातील मथुरा एक्सप्रेस वे वर मंगळवारी मृत्यूचे तांडव पाहायला मिळाले. दाट धुक्यामुळे पहाटे साडे चारच्या सुमारास आठ बस आणि तीन मोटारी एकमेकांवर आदळल्या. त्यानंतर वाहनांनी पेट घेतला यामध्ये २५ जणांचा होरपळून मृत्यू झाला तर ५९ जण गंभीर जखमी झाले. या अपघाताने देशभर हळहळ व्यक्त होत आहे. अर्थात असा भीषण अपघात घडल्याची ही पहिली वेळ नाही याआधी असे अनेक अपघात देशात घडले असून त्यात लाखो लोकांचा जीव गेला आहे. गेल्या दहा वर्षात देशभरात झालेल्या अपघातात १५ लाख ३० हजारांहून अधिक अधिक नागरिकांचा मृत्यू झाला आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाने ही आकडेवारी जाहीर केली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाच्या संकेत स्थळावर ही आकडेवारी उपलब्ध असून त्यानुसार सण २०१३ ते २०२३ या दहा वर्षात रस्ते अपघातात बळी पडलेल्यांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. पहिल्या स्थानावर उत्तर प्रदेश तर दुसऱ्या स्थानावर तामिळनाडू ही राज्ये आहेत. महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्यासाठी ही आकडेवारी भूषणावह नाही. रस्ते अपघातात जर इतके लोक दरवर्षी मरण पावत असतील तर ती चिंतेची बाब आहे. विशेष म्हणजे यातील बहुतांशी मृत्यू हे २० ते ५० या वयोगटातील आहे. याचाच अर्थ रस्ते अपघातात सर्वाधिक मृत्यू हे तरुणांचे होत आहेत. ज्या तरुणांकडे देश भावी आधारस्तंभ म्हणून पाहत असतो तेच तरुण जर असे अकाली मृत्यू पावत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. केवळ सर्वसामान्य तरुणच नाही तर देशातील अनेक महनीय व्यक्तींचा मृत्यू देखील रस्ते अपघातात झाला आहे. दोन वर्षापूर्वी शिवसंग्राम पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आणि मराठा समाजाचे नेते विनायक मेटे यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठा समाजाचीच नव्हे तर राज्याची मोठी हानी झाली. त्यांच्या अपघाती निधनातून राज्य सावरत नाही तोच टाटा उद्योग समूहाचे माजी अध्यक्ष व प्रसिद्ध उद्योगपती सायरस मिस्त्री यांचे अपघाती निधन झाले. सायरस मिस्त्री यांचा गुजरातच्या अहमदाबादवरून मुंबईला जाणाऱ्या मार्गावर चारोटी जवळ सुर्या नदीच्या पुलावर अपघात झाला. सायरस मिस्त्री यांचे देशाच्या औद्योगिक विकासात महत्वाचे योगदान आहे. त्यांच्या निधनाने उद्योग विश्वात मोठी शोककळा पसरली होती. सायरस मिस्त्री, विनायक मेटे यांच्यासारख्या समाजातील महनीय व्यक्तींच्या अशा अकाली निधनाने समाजाचे मोठे नुकसान होत आहे. विनायक मेटे, सायरस मिस्त्री हे समाजातील महनीय व्यक्ती आहेत म्हणून



त्यांच्या निधनाची बातमी झाली. रस्ते अपघातात दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो देशात सर्वात जास्त मृत्यू रस्ते अपघातात होतात. अपघातात जखमी आणि कायमचे जायबंदी होणाऱ्यांची संख्या तर अगणित आहे. विशेष म्हणजे यात तरुणांचा समावेश अधिक आहे. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत त्याच तरुणांचे अपघातात निधन होत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. अनेक प्रयत्न करूनही देशातील रस्ते अपघातांची संख्या का कमी होत नाही हा संशोधनाचा विषय आहे. वाढत्या रस्ते अपघातांना जितकी व्यवस्था जबाबदार आहेत तितकीच मानवी चुकाही जबाबदार आहेत. टोलच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची वसुली केली जात असतानाच महामार्गावर जीवघेण्या ब्लॅकस्पॉट मध्ये सुधारणा होत नाही. त्याचप्रमाणे रस्त्यांवरील खड्डे, धुळीचे साम्राज्य, महामार्गावरील अतिक्रमणे, सर्व्हिस रोडचा अभाव, रस्त्यावरच उभी केली जाणारी अवजड वाहने, बंद पडलेल्या वाहनांसाठी कमी पडत असलेली मदत केंद्रे, मोकाट जनावरे, अपुरे दुभाजक याबाबी अपघातांसाठी कारणीभूत ठरत आहेत. महामार्गावर वाहन चालकांकडून वेग मर्यादा पाळण्यात येत नाही. बहुतेक प्रवासी १०० किमी पेक्षा अधिक वेगाने वाहने चालवतात. ट्रक व इतर मोठ्या वाहनांकडून लेनची शिस्त पाळली जात नाही. काही वाहन चालक तर दारु पिऊन वाहने चालवतात तर काही वाहन चालक वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलतात. वाहनांची व्यवस्थित निगा न राखणे, सीट बेल्ट न लावणे या गोष्टीही अपघातास कारणीभूत ठरतात. नियम माहीत असूनही चालक त्यांचे पालन करत नाहीत. सगळ्यांनाच कमी वेळात आपले ठिकाण गाठायचे असते. नियमांचे पालन न केल्यानेच अपघातांची संख्या कमी होत नाही. अपघातांची संख्या कमी करायची असेल तर वाहन चालकांना नियमांचे पालन करावेच लागेल. नियम पाळा अपघात टाळा!

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

# २०२६ च्या वाङ्मय पुरस्कारासाठी ग्रंथ पाठविण्याचे मसापचे आवाहन

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने दरवर्षी उत्कृष्ट ग्रंथांना वाङ्मय पुरस्कार देण्यात येतात. २०२६ चे नरहर कुरुंदकर वाङ्मय पुरस्कार, प्राचार्य म.भि. चिटणीस वाङ्मय पुरस्कार, कुमार देशमुख नाट्यपुरस्कार, कै. कुसुमताई देशमुख काव्यपुरस्कार, बी. रघुनाथ कथा कादंबरी, नरेंद्र मोहरीर वाङ्मयपुरस्कार, रा.ज. देशमुख स्मृतीपुरस्कार दिले जाणार आहेत. या वर्षीही १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या मराठीतील सर्वोकृष्ट काव्यसंग्रहाला आणि ग्रंथाला हे पुरस्कार देण्यात येणार आहेत. त्यांचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे. १. नरहर कुरुंदकर वाङ्मयपुरस्कार रुपये ३,०००/- : या पुरस्कारासाठी वरील कालावधीत कुठल्याही वाङ्मय प्रकारातील उत्कृष्ट ग्रंथाचा विचार होऊ शकेल. समीक्षा ग्रंथही या पुरस्कारासाठी पाठविता येऊ शकतील. मात्र, हा पुरस्कार मराठवाड्यातील लेखकासच मिळेल. प्रकाशक आणि प्रकाशन स्थळ कुठलेही असू शकेल.

२. प्राचार्य म. भि. चिटणीस वाङ्मयपुरस्कार रुपये ३,०००/- : मराठी भाषेत लिहिणाऱ्या कुठल्याही लेखकाला या पुरस्कारासाठी पुस्तक पाठविता येईल. प्रदेशाचे बंधन नाही. हा पुरस्कार वैचारिक लेखनासाठी, सौंदर्यशास्त्रावरील लेखनासाठी अगर समीक्षा ग्रंथासाठी दिला जाणार आहे.

३. कुमार देशमुख नाट्यपुरस्कार रुपये ३,०००/- : मराठी भाषेत लिहिणाऱ्या कुठल्याही नाटककाराला या पुरस्कारासाठी आपले नाटक किंवा नाटकावरील समीक्षाग्रंथही पाठविता येईल. प्रदेशाचे बंधन नाही. हा पुरस्कार नाट्यलेखनासाठी दिला जातो.

४. कै. कुसुमताई देशुमख काव्यपुरस्कार रुपये ३,०००/- : हा पुरस्कार मराठीतील उत्कृष्ट काव्यसंग्रहाला दिला जातो. प्रदेशाचे बंधन नाही.

५. बी. रघुनाथ, कथा कादंबरी पुरस्कार रुपये ३,०००/- : मराठीतील उत्कृष्ट कथासंग्रहाला किंवा उत्कृष्ट कादंबरीला हा पुरस्कार देण्यात येतो. या पुरस्कारासाठीही प्रदेशाचे बंधन नाही.

६. नरेंद्र मोहरीर पुरस्कार रुपये, ५०००/- : हा पुरस्कार इतिहास, सांस्कृतिक मीमांसा, कला मीमांसा, यावरील उत्कृष्ट ग्रंथासच देण्यात येईल.

७. रा.ज. देशमुख स्मृतिपुरस्कार रुपये २,०००/- : मराठी ग्रंथ व्यवहारात (प्रकाशक, मुद्रितशोधक, बहुश्रुतवाचक, ग्रंथ प्रकाशन व्यवहार) लक्षणीय काम करणाऱ्या व्यक्तीस हा पुरस्कार दिला जातो.

ज्या लेखकांना, कवींना व प्रकाशकांना वरील पुरस्कारासाठी ग्रंथ पाठवायचे असतील त्यांनी ग्रंथाच्या तीन प्रती १० फेब्रुवारी २०२६ पर्यंत कार्यवाह, मराठवाडा साहित्य परिषद, अनंत भालेराव भवन, यशवंतराव चव्हाण नाट्यगृह परिसर, सन्मित्र कॉलनी, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००१ या पत्त्यावर पाठवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559